SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३१३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२४ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## मुंबईत मुसळधार पावसाला सुरुवात, पुढचे ५ दिवस महत्त्वाचे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** महाराष्ट्राला ज्याची प्रतिक्षा होती ते क्षण आता आले आहेत. राज्यात अखेर मान्सूनचे आगमन झाले आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये म ान्सून पावसाच्या सरी बरसल्या आहेत. राज्यात सर्वदूर मान्सून पोहोचला आहे. आगामी सात ते आठ दिवसांमध्ये राज्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये म ान्सून जोरदार बरसणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यासोबतच जलाशय आणि धरणांमधील पाण्यासाठ्यात वाढ होऊ शकतो. यामुळे पिण्याच्या पाण्याचा देखील प्रश्न हळूहळू सुटण्याची शक्यता आहे. हवाम ान विभागाने राज्यातील मान्सूनबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

हवामान विभागाकडून आज आणि उद्यासाठी पालघर जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. तर ठाणे आणि मुंबई या दोन जिल्ह्यांसाठी आजपासून पुढचे तीन दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

**कोकणात पावसाचा अंदाज काय?**

रायगड जिल्ह्याला आजसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्यापासून पुढचे चार दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्याला आज पावसाचा रेड अलर्ट म्हणजेच अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला होता. तर उद्या पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसचे त्यापुढचे तीन दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला उद्यासाठी पावसाचा यलो अलर्ट आहे तर त्यापुढचे दोन दिवस ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**उत्तर महाराष्ट्रासाठी पावसाचा अंदाज काय?**

जळगाव जिल्ह्यात आज आणि उद्या तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर नाशिकमध्ये आजपासून पुढच्या तीन दिवसांसाठी पावसाटा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याला आजपासून पुढचे चार दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**पुण्यातही पावसाचा अंदाज**

पुण्यात आज घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर इतर ठिकाणी पुढच्या पाच दिवसांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**कोल्हापूरला चार दिवसांसाठी पावसाचा अलर्ट**

कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांना पुढील चार दिवसांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर जालन्यात आज आणि उद्या पावसाची शक्यता आहे. यानंतर २६ जूनला पावसाची शक्यता आहे. परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांना २६ जूनसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. नांदेडमध्ये आज आणि २५ जूनलाही पावसाची शक्यता आहे.



**अमरावतीतही पावसाचा अंदाज**

लातूर, धाराशिव या जिल्ह्यांना उद्यापासून सलग चार दिवस पावसाची शक्यता आहे. पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर अकोल्याला आजपासून पुढचे दोन दिवस आणि अम रावतीला आजपासून पुढचे तीन दिवस पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**चंद्रपूरला सलग पाच दिवस पाऊस पडण्याची शक्यता**

भंडाऱ्याला आजपासून पुढचे तीन दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आळा आहे. तर बुलढाणा जिल्ह्याला उद्यापासून दोन दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्याला आजपासून सलग पाच दिवसांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर गडचिरोलीला उद्यापासून चार दिवस, गोंदियाला उद्यापासून तीन दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**विदर्भातही पावसाचा अंदाज**

नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांना आजपासून पुढचे चार दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांना २७ जूनलाही पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यलो अलर्ट जारी केलेल्या ठिकाणी ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

## भरदिवसा ट्रान्सफॉर्मर कोसळला; बाईकस्वार व महिला थोडक्यात बचावले

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.२३, डोंबिवली :** डोंबिवलीतील ९० फूट रोडवरील ९० फूट चहा वालासमोरील बाजूस उभारण्यात आलेला विद्युत ट्रान्सफॉर्मर अचानक कोसळल्याने एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. ट्रान्सफॉर्मर थेट एका दुचाकीवर कोसळल्याने वाहनाचे मोठे नुकसान झाले. मात्र दुचाकीस्वार व त्यांच्यासोबत असलेली महिला नशिबाने बचावल्याने संभाव्य जीवितहानी टळली.

घटनेची माहिती मिळताच नगरसेवक प्रदीप चौधरी, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील, केडीएमसीचे वॉर्ड अधिकारी तसेच महावितरणचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

यावेळी नगरसेवक प्रदीप चौधरी यांनी महावितरणच्या गलथान कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत, अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असून नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. महावितरणने तातडीने योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे स्पष्ट मत व्यक्त केले.

मात्र केडीएमसीचे वॉर्ड अधिकारी आणि महावितरणचे अधिकारी यांनी प्रसारम ाध्यमांसमोर बोलणे टाळल्याने अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत.

या ट्रान्सफॉर्मरला महानगरपालिकेची परवानगी होती का? पडलेल्या ट्रान्सफॉर्मरची यापूर्वी कोणाकडून तक्रार करण्यात आली होती का? त्याची नियमित तपासणी झाली होती का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

जर या दुर्घटनेत त्या दोघांचा जीव गेला असता तर त्याची जबाबदारी कोण घेतली असती? असा संतप्त सवाल आता परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महावितरण आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचा जीव धोक्यात येत असल्याचा आरोप होत असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## मृत्यूच्या इंजेक्शनचा 'डोस' कोणी दिला ?

### बनवसमधील तरुणाच्या मृत्यूने खळबळ; बोगस डॉक्टरांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, पालम (परभणी) :** तालुक्यातील बनवस येथे एका २५ वर्षीय तरुणाच्या संशयास्पद मृत्यूने आरोग्य यंत्रणेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निम ार्ण केले आहे. डाव्या हाताच्या वेदनांसाठी दवाखान्यात गेलेल्या गणेश ज्ञानोबा राजले या तरुणाचा इंजेक्शन व सलाईन दिल्यानंतर मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला असून, संबंधित डॉक्टर बापूसाहेब प्रसादआप्पा लांडगे यांच्या विरोधात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, २१ जून रोजी सकाळी गणेश राजले याला हात दुखत असल्याने बनवस येथील खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी सलाईनमधून इंजेक्शन दिल्यानंतर काही वेळातच त्याला छातीत तीव्र वेदना सुरू झाल्या. प्रकृती बिघडत असल्याचे लक्षात येताच संबंधित डॉक्टरांनी अहमदपूर येथे नेण्याचा सल्ला देत दुसऱ्या डॉक्टरचा मोबाईल क्रमांक दिला. मात्र अहमदपूरला रवाना होण्याआधीच गणेशची प्रकृती अधिक खालावली आणि काही वेळात त्याचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर संतप्त झालेल्या कुटुंबीयांनी संबंधित डॉक्टरांकडे उपचारादरम्यान दिलेल्या औषधांची व इंजेक्शनची माहिती मागितली. मात्र ती देण्यास नकार देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे संशय आणखी गडद झाला आहे.

**माझ्या मुलाचा बळी गेला, न्याय मिळाल्याशिवाय गप्प बसणार नाही**

संबंधित डॉक्टरांकडे कोणतीही वैध वैद्यकीय पदवी नसताना ते उपचार करत आहेत. त्यांच्या चुकीच्या उपचारामुळे माझ्या मुलाचा जीव गेला. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया मयताचे वडील ज्ञानोबा मुंजाजी राजले यांनी व्यक्त केली.

गावकऱ्यांमध्ये दबक्या आवाजात सुरू असलेल्या चर्चेनुसार यापूर्वीही याच डॉक्टरकडून काही रुग्णांना उपचारादरम्यान रिअक्शन आल्याच्या व एक दगावल्याची घटना घडल्या होत्या. मात्र आर्थिक तरतूद करून सदरील प्रकरणे दडपले होते. त्याम ुळे संबंधित डॉक्टर अधिकृत आहेत की बोगस, याची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

**आरोग्य विभाग झोपेत का ?**

एकीकडे वैद्यकीय पात्रतेबाबत प्रश्न उपस्थित होत असताना दुसरीकडे तालुका आरोग्य विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. अनेक वर्षापासून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीची पात्रता तपासण्याची तसदी ही आरोग्य यंत्रणेने घेतली नाही का असा सवाल ग्राम स्थ उपस्थित करत आहेत.

दरम्यान पालम पोलिसांनी या प्रकरणाची नोंद घेतली असून शवविच्छेदन व वैद्यकीय अहवालानंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे .मात्र गणेश राजलेच्या मृत्यू मागचे खरं कारण काय आणि त्यासाठी नेमका जबाबदार कोण याचे उत्तर आता चौकशीतुन समोर येणार आहे.

## कर्जमाफी झालीच पाहिजे!

### बैलावर स्वार होऊन शेतकरी पोहोचला तहसील कार्यालयात

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.२३, राजुरा (चंद्रपूर) :** कर्जमाफी झालीच पाहिजे... या घोषणा तर तुम्ही अनेकदा ऐकल्या असतील. पण चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरामध्ये एका शेतकऱ्याने यासाठी जे केलं, ते पाहून सध्या संपूर्ण चंद्रपूर थक्क झालाय! राजुरा तालुक्यातील गोयेगावचे शेतकरी दिवाकर हिरामण पहानपटे यांनी थेट बैलावर स्वारी करत राजुरा तहसील कार्यालय गाठलं. त्यांच्या या अनोख्या आंदोलनाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकला असून प्रशासनाचे डोळे उघडण्यासाठी दिवाकर यांनी हे पाऊल उचललं. कर्जमाफी झालीच पाहिजे अशा घोषणा देत जेव्हा ते बैलावर बसून आले, तेव्हा तहसील कार्यालयाबाहेर पाहणाऱ्यांची एकच गर्दी जमली होती.

## मुख्य माहिती आयुक्तांच्या चर्चेनंतर अण्णा हजारेंचे उपोषण स्थगित

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.२३, अहिल्यानगर :** माहिती अधिकार कायद्यातील दुरुस्त्यांविरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. जनता मालक आणि अधिकारी सेवक आहेत, मात्र सध्या अधिकारी मालकासारखे वागत आहेत, असा आरोप त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक प्राथमिक चर्चेनंतर अण्णांनी ५ तारखेचे नियोजित आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे. परवा होणाऱ्या पुढील महत्त्वपूर्ण बैठकीत मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला असून या बैठकीवरच आंदोलनाची पुढील दिशा ठरणार असल्याचे अण्णा हजारे यांनी सांगितले.

**अण्णा हजारे का उपोषण करणार होते?**

माहिती अधिकार अतंर्गत माहिती मागवताना आता राज्य सरकारने नवे निकष लागू केले आहेत. या निकषांविरोधात माहिती अधिकार कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या नव्या नियमांविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. हे नवे नियम माहितीचा अधिकार कमकुवत करणारे आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारे असल्याचा थेट आरोप अण्णांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक पत्र पाठवून हे जाचक नियम तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. नव्या नियम ावलीतील तरतुदींवर अण्णा हजारे यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. माहिती मागवण्यासाठी करण्यात आलेली भरमसाठ शुल्कवाढ, अर्जदाराला ओळखपत्राची केलेली सक्ती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक विषय-एक अर्ज ही नवी अट, यांमुळे सर्वसामान्यांना माहिती मिळवणे अत्यंत कठीण होणार आहे. ही एकप्रकारे माहिती अधिकार कायद्याची गळचेपी असून, पारदर्शकता संपवण्याचा हा प्रकार असल्याचा दावा आण्णांनी पत्रात केला आहे.

## कत्तलीसाठी नेली जाणारी १२ गोवंश जनावरांची सुटका

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, कोरपना (चंद्रपूर) :** गडचांदूर पोलीस हद्दीतून एका पिकअप वाहनातून कत्तलीच्या उद्देशाने अत्यंत निर्दयतेने नेली जाणारी १२ गोवंश जनावरे (गाई) सोडवण्यात गडचांदूर पोलिसांना मोठे यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी वाहनासह एकूण ७ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून, सदर कारवाई २२ जून रोजी करण्यात आली. या कारवाईत संतोष रामाजी परचाके (३५) रा. कळंब, हळदीपुरा ता. जि. यवतमाळ याला ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर १२ जनावरांना वाहनामध्ये अत्यंत निर्दयतेने कोंबण्यात आले होते. तसेच त्यांच्यासाठी चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नव्हती. वाहनातील इसमाकडे पशुवैद्यकीय डॉक्टरांचे प्रमाणपत्र किंवा जनावरांच्या खरेदी-विक्रीच्या पावत्यांबाबत विचारणा केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. यावरुन पोलिसांना संशय आल्याने त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, सदर जनावरे कत्तलीसाठी बाहेरगावी घेऊन जात असल्याचे त्याने कबूल केले.



या कारवाईत कत्तलीच्या उद्देशाने अवैधरित्या आणि निर्दयतेने घेऊन जात असलेली एकूण नग १२ जिवंत जनावरे (गाई) एकूण किंमत २ लाख ४० हजार रुपये आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले पिकअप वाहन महिंद्रा मॅक्स बोलेरो पिकअप अंदाजे ५ लाख रुपये असा एकूण ७ लाख ४० हजारांचा माल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून, त्याचा फरार साथीदार (पिकअप वाहन चालक) याचा शोध घेणे सुरु आहे. गुन्ह्याचा पुधील तपास गडचांदूर पोलीस करीत आहे.

सदरची यशस्वी कारवाई चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र जाधव यांच्या म ार्गदर्शनाखाली आणि गडचांदूरचे ठाणेदार शिवाजी कदम यांच्या नेतृत्वात सपोनी सुखदेव गोदे, पोलीस अंमलदार बलवंत शर्मा, सुरज, प्रकाश आणि साईनाथ यांनी केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास गडचांदूर पोलीस करत आहेत.




## पाणी मुरते तरी कुठे?

राज्यातील धरणांनी सध्या तळ गाठल्याची स्थिती दिसते आहे. त्यात जून संपत आला, तरी मान्सून पुढे सरकत नसल्याने पाणीटंचाईचे ढग दाटून आले आहेत. मुंबई, पुणे, नाशिकसह सर्वच प्रमुख शहरांत एव्हाना पाणीकपात लागू झाली आहे किंवा तसे नियोजन तरी सुरू आहे. ग्रामीण भागातील चित्र अधिक गंभीर असल्याने तेथे एप्रिल-मेपासूनच टँकरवाऱ्या सुरू आहेत. जुलै-ऑगस्टपर्यंत पाणी पुरविण्याचे आव्हान प्रशासनापुढे असल्याने मृत साठा, विहिरी, तलावांतील आरक्षित पाण्याचा उपसाही सुरू आहे. जुनीपुराणी 'आउटडेटेड' वाहने काळ्याकुट्ट धुराचे लोट उडवत पाणी घेऊन धावत आहेत. जूनमध्ये पावसाची चक्क साठ ते सत्तर टक्के तूट दिसत आहे, ज्यामुळे 'धोंड्या धोंड्या पाणी दे' अशी आर्त हाक देण्याची वेळ उभ्या महाराष्ट्रावर आली आहे.

पण मुळात, गेली दोन वर्षे झालेल्या दमदार पावसाने धरणे काठोकाठ भरूनही राज्यावर ही वेळ का यावी, हा प्रश्न कोणाही सुजाणाला पडावा. सध्या धरणांत जेमतेम २५ टक्के पाणी उरले आहे आणि ते जुलै-ऑगस्टपर्यंत पुरविण्याचे आव्हान स्थानिक पातळ्यांवर आहेच. गेल्या वर्षी याच काळात जलाशयांत सुमारे ३३ टक्के पाणीसाठा होता. सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यमान बरसले. नदी, नाले आणि धरणे ओसंडून वाहिल्यानंतरही टंचाई का निर्माण होते, पाणी नेमके मुरते कुठे, या मूळ प्रश्नांची उत्तरे आपण खरोखरच शोधतो काय? कुठल्या तरी 'फॅक्टर'मुळे उन्हाचा तडाखा अधिक होता. वाढत्या तापमानाने बाष्पीभवन झाल्याचे सांगून हे पाणी 'छू मंतर' झाल्याचे कदाचित सांगितले जाईल. परंतु, हे शंभर टक्के खरे तरी कसे मानावे? पाऊस कमी-जास्त झाला, तरी दरवर्षी पाण्याची वारेमाप उधळपट्टी थांबत नाहीत. धरणांचा जिल्हा म्हटल्या जात असलेल्या एकट्या नाशिकमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा सहा टक्के अधिक पाण्याची नासाडी झाली. इतर शहरांतही कमी-अधिक फरकाने अशीच स्थिती असावी.

जल हेच जीवन असल्याने भविष्यातील युद्धे पाण्यावरूनच होतील, असे धुरिणांनी कित्येक वर्षांपूर्वीच सांगून ठेवलेले आहे. संत-महात्म्यांच्या अभंगांतही तसे दाखल आहेतच. दुर्दैवाने तरीसुद्धा पाण्याबद्दलची बेफिकिरी टळत नाही. 'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा ९४ टक्केच पाऊस पडणार असा इशारा हवामान खात्याने सुरुवातीलाचा वर्तविला. मग आपण काय उपाय केले? टंचाईच्या झळा बसूनही पाण्याचे महत्त्व, किंमत कळू शकलेली नाही. तहान लागल्यावर धरणांकडे वळण्याची वृत्ती कधीतरी थांबावी. दुसऱ्या बाजूला सदोष संरचनेमुळे धरणांना गळती लागते, तशी ती व्यवस्थेलाही लागलेलीच असते. अलीकडे रस्ते, विकासकामांत भ्रष्टाचार वाढल्याचे म्हटले जाते. या गैरव्यवहाराची चर्चा होते, तशी ती पाण्याबाबत का होत नाही? जलाशयांतून अवैध डोंगळ्याद्वारे पाणी चोरले जाते, तसे ते दिवसाढवळ्या डोळ्यासमोरून वाहणाऱ्या आवर्तनातूनही होतच असते. उगमाच्या ठिकाणावर आणि शेताच्या बांधाबांधावरची परिस्थिती दुर्दैवाने बदलायला तयार नाही.

काठांवर वसलेल्या मद्याच्या कारखान्यांना पाणी पुरवणाऱ्या लॉबीला कधीतरी जबाबदार ठरविले गेले तरी 'पानी का पानी' होईलच. प्रतिमाणशी पाण्याच्या उधळपट्टीची चर्चा होते, मग याच न्यायाने प्रतिमाणशी पाणीबचतीबाबतही कधीतरी बोलायलाच हवे नाही काय? नासाडी टाळणे हेसुद्धा संवर्धनच ना! लांबलेला पाऊस आणि धरणांतून गळणारे पाणी बरेच काही सांगू इच्छिते; परंतु आपण ते लक्षात घ्यायला तयार नाही. उशीर झाला असला तरी अद्यापही वेळ गेलेली नाही. निसर्गाच्या हाका लक्षात घेतल्यास आणि पाण्याचे नियोजन कागदावरून पुढे सरकल्यास आशेचा किरण नक्कीच दिसू शकेल. मृग कोरडा गेला, तरी आर्द्र मदतीला धावून येईल; अन्यथा आभाळ दाटूनही पावसाची हुलकावणी सुरूच राहील. मग पाच-पंचवीस मीटरपर्यंत खालावणारी पाणीपातळी मोजत बसण्याशिवाय हाती तरी काय उरणार? पाण्याचे स्रोत शोधतो, तसे ते मुरते तरी नेमके कुठे, हेही कधीतरी शोधून काढायला हवेच ना!

– संपत थेटे

# समर्पणाशिवाय ईहलोकी कीर्ती व परलोकी सदगती मिळत नाही

**एका बीजा केला नास ।**
**मग भोगिले कणीस ।।१।।**
**कळे सकळां हा भाव ।**
**लाहानथोरांवरी जीव ।।ध्रु.।।**
**लाभ नाहीं फुकासाठीं ।**
**केल्यावीण जीवासाठीं ।।२।।**
**तुका म्हणे रणीं ।**
**जीव देतां लाभ दुणी ।।३।।**

साहित्यपूजक ज्ञानश्रेष्ठ जगद्गुरू संत तुकोबाराय वरीलअभंगामध्ये शेतकरी जीवनाविषयी व शेतीविषयक बी- बियाण्याचा दाखला देऊन जीवनात कोणत्याही कार्याप्रति समर्पणाला किती महत्व आहे यांचे उदाहरण देत आहे. आपला हा भारत देश कृषिप्रधान आहे. संपूर्ण भारतातील कितीतरी लोक हे शेतीवर आपला जीवनप्रवाह चालवतात. साधारण सत्तर ते पच्च्याहत्तर टक्के जनता ही खेड्यात राहते व खेड्यातील लोकांचा शेती व शेतीपूरक व्यवसाय आहे. आणि या शेती व्यवसायाचा कष्टकरी कामगार अर्थात राब राब राबून समस्त जगाच्या मुखी घास घालण्यासाठी झटणारा एकमेव जर कोण असेल तर तो म्हणजे माझा शेतकरी राजा...!

जगद्गुरू संत तुकोबाराय या शेतकरी राजाच्या जीवनसंघर्षाबददल त्यांच्या अभंगातील पहिल्या चरणात म्हणतात कि,

**एक बीजा केला नास ।**
**मग भोगिले कणीस ।।**

अर्थात शेतकरी शेतात धान्यांचा एक दाना पेरतो. त्या काळ्या माऊलीच्या पोटात दाना टाकून मातीने परत झाकून टाकतो. त्या बियाला नाना प्रकारच्या वेदना सहन कराव्या लागतात. अंधकारमय मातीखाली तो श्वास रोखून जगतो. जेव्हा त्यावर वरून राजाचा वर्षाव होतो तेव्हा त्या मातीतील अंधकारमय मातीच्या पोपड्याला छेदून आपलं कोवळसं रूप बाहेर काढतो आणि सूर्यप्रकाशाकडे आतुरतेने बघतो तेव्हा तेच बी स्वतःला संपवून एका नव्याशेकडो दाण्याच्या निर्मितीसाठी सज्ज असते. अर्थात एका दाण्याच्या जरी नास झाला तरी त्यापासून कणीसाच्या रूपाने अनेक दाण्याची निर्मिती होऊन कितीतरी लोकांच्या मुखी त्यातून अन्नाचा घास जाणार आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्याचे जीवन सुद्धा आहे तो स्वतः कितीही दुःखात असला तरी, जगाच्या हितासाठी जीवाचे रान करुन जीवन समर्पण करत असतो.

जगद्गुरु संत तुकोबाराय अभंगाच्या दुसऱ्या चारणात म्हणतात,

**कळे सकळां हा भाव ।**
**लाहानथोरांवरी जीव ।।**

अर्थात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना ही गोष्ट कळतच असते. आपण बघतो जन्माला आल्यापासून आपल्याला अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो बालपण असो शालेय जीवन असो. पदोपदी आपल्या जीवनात संघर्ष असतोच. आपला जीव खर्ची घातल्या शिवाय फुकट काही मिळत नाही. याची अबालवृद्धाना जाणीव असते. आणि ज्यांना ह्या गोष्टीची जाणीव असते तेच जगात कौतुकास पात्र असतात. तुकोबाराय अभंगाच्या तिसऱ्या चरणात म्हणतात,

**लाभ नाहीं फुकासाठीं ।**
**केल्यावीण जीवासाठीं ।।**

अर्थात जीवन जगतांना प्रत्येक जीवाला फुकट असे काहीच मिळत नाही.मानवा बरोबर इतर प्राणीमात्रा असो अथवा वनस्पती अर्थात सृष्टीतील प्रत्येक सजीव घटकाला त्याचं अस्तित्व टिकवण्यासाठी झटावेच लागेल. अगदी या लहानात लहान प्राणी मुंगी असो अथवा महाकाय प्राणी हत्ती असो यांना सुद्धा संघर्ष करावाच लागेल म्हणून तुकोबाराय म्हणतात प्रयत्नाशिवाय या जीवाला काहीच अवगत होणार नाही. जगद्गुरु तुकोबाराय अभंगाच्या अंतिम चरणात म्हणतात,

**तुका म्हणे रणीं ।**
**जीव देतां लाभ दुणी ।।**

अर्थात एखादा योद्धा रंगागणामध्ये धर्माच्या अर्थात सत्याच्या बाजूने युद्ध लढतअसेल तर, युद्धप्रसंगी त्याला त्याचा जीव गमवावा लागला तर, त्याला त्याचा लाभ होतो अर्थात त्याला इहलोकी कीर्ती मिळते आणि परलोकी सद्गती प्राप्त होते. कारण त्याचे जीवन हे सत्यासाठी धर्मासाठी न्यायासाठी समर्पित झालेले असते.

अश्याप्रकारे जगद्गुरू संत तुकोबाराय त्यांच्या अभंगातून भक्तीबरोबर समाजातील दैनंदिन जीवनाचा चिंतनचा अभ्यास करतांना मानवाला जीवाला उपदेश करतात कि,आपला देह झिजवल्याशिवाय काहीच मिळत नाही जर तुमच्या यशाचा आणि कीर्तीचा सुंगंध चहुकडे पसरवायचा असेल तर, त्याग समर्पण शिवाय पर्याय नाही. तेव्हाच ईहलोकी कीर्ती मिळते व परलोकी सदगती मिळते.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**




**श्याम ठाणेदार, दौंड जि.पुणे**
**संपर्क : ९९२२५४६२९५**

यावर्षी सरासरीपेक्षा कमी आणि उशिरा पाऊस येईल असे भाकीत भारतीय हवामान खात्याने तसेच स्कायमेटने वर्तवले होते. आज ते भाकीत खरे ठरताना दिसत आहे कारण दरवर्षी ७ जूनला येणारा मान्सून अजूनही आलेला नाही. अल निनोमुळे मान्सून लांबला असल्याचे कारण या क्षेत्रातील तज्ज्ञ देत आहे. आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सूनचे आगमन होईल असे हवामान खात्याने सांगितले आहेहा अंदाज खरा ठरावा आणि वरून राजाने कृपा करावी यासाठी बळीराजाने देव पाण्यात बुडवले आहेत.

कारण आपल्या देशातील बहुतांशी शेती ही पावसावर आहे. सुमारे ६० टक्क्यांहून अधिक शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत. पाऊस लांबल्याने पेरणी लांबली आहे. पेरणी लांबल्याने शेतीचे वेळापत्रकच कोलमडून पडले आहे गेल्या काही वर्षात हे चित्र सातत्याने पाहायला मिळत होते यावर्षी तेच होणार असे एकंदरीत दिसत आहे. यावर्षी जून महिन्याच्या सरासरी १० टक्के इतकाही पाऊस झालेला नाही. राज्यातील खरीप पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ०.७७ टक्केच म्हणजेच केवळ १ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. राज्यात खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १४२.०२ लाख हेक्टर असून ऊस पिकासह हे सरासरी क्षेत्र १५२. ९७ लाख हेक्टर आहे.

पाऊस लांबल्याने आता क्षेत्रात पेरणी देखील रखडली आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली आणि पावसाने ओढ दिली तर त्याचा परिणाम केवळ खरीप हंगमावरच नाही तर रब्बी हंगामांवर देखील होऊ शकतो. पाऊस लांबल्याने कृषी उत्पादनाची टक्केवारी अर्थातच कमी होण्याची शक्यता आहे. पाऊस कमी झाला की महागाई वाढते हे समीकरणच आहे. महागाई वाढली की त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. यावर्षी पाऊस लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो? देशातील बावीस कोटी जनावरांचा चारा पावसावरच अवलंबून आहे. जर वेळेत आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर या जनावरांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिह निर्माण होऊ शकते. पोटच्या लेकरांप्रमाणे वढवलेले पशुधन टिकवायचे कसे या विवंचनेत बळीराजा आहे. जर पाऊस वेळेत झाला नाही जनावरांना चारा मिळाला नाही तर देश देशातील दूध उत्पादन घटू शकते परिणामी त्याचा फटका दुग्धजन्य पदार्थांना बसू शकतो. एकूणच पाऊस वेळेत आणि पुरेसा आला नाही तर त्याचा फटका शेतीलाच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेला बसू शकतो.

देशाची अर्थव्यवस्था आता कुठे रुळावर येऊ लागली असताना हे संकट उभे राहिले असल्याने या संकटाला सामोरे जाण्यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करायला हवी. मागील काही वर्षांपासून निसर्गचक्र बदलले आहे. पावसाचे प्रमाण आणि महिनेही बदलले आहेत. जेंव्हा नको तेंव्हा पाऊस पडतो आणि जेंव्हा गरज असते तेंव्हा दडी मारतो. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी पूर्ण करतो मात्र त्याचा आपल्या शेतीला काही उपयोग होत नाही उलट नुकसानच होते. देशातील कृषी क्षेत्र नेऋत्य पावसावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. पावसाने हुलकावणी दिल्याने पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन जून महिन्यात अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. धरणातील पाण्याचा साठा संपत आल्याने अनेक ठिकाणी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा पाणीपुरवठा होत आहे. जर ऐन पावसाळ्यात ही अवस्था असेल पुढील उन्हाळ्यात काय अवस्था असेल याची कल्पना जरी केली तरी अंगावर काटा येतो. अल निनोमुळे निसर्गचक्र बिघडले असे म्हटले जात असले तरी याला केवळ अल निनोच जबाबदार आहे असे नाही. याला आपण म्हणजे मानव देखील तितकेच जबाबदार आहे हे मान्य करावे लागेल कारण मानवाने कारण नसताना निसर्गावर अतिक्रमण केले. बेसुमार वृक्षतोड करून सिमेंटची जंगले उभारली. जितके वृक्ष तोडले तितके वृक्ष लावले नाहीत या सर्व बाबी निसर्गाच्या लहरिपणास जबाबदार आहेत. आता तरी आपण सुधारायला हवे. वृक्षतोड थांबवायला हवी. निसर्गात मानवाचा होणारा हस्तक्षेप रोखायला हवा. सरकारनेही पाण्याचे योग्य नोयोजन करायला हवे. शेतकऱ्यांनीही मान्सूनच्या बदलत्या आलेखानुसारच शेतीचे नियोजन करायला हवे.

## कक्ष



वृध्दां वाढे अत्याचार
कितीदा रहायचे दक्ष
आयुष्यबनतोयं शाप
कुणाचे नसेकसे लक्ष

पडूनये झडू नये बुवा
कितीरहायचे हो दक्ष
समान असे वेदना ती
वृद्धाश्रमी प्रत्येककक्ष

का नेत नाहीससोबत
यमही करतोयं दुर्लक्ष
चोर न् लुटारूघेरतात
दरोडा टाकती समक्ष

इजा पोचवतात सारे
बडवत बसायचे वक्ष
वाटपाहतात आतुरते
कधी घाले श्राध्दपक्ष

वृध्दांचीकशी विनंती
कधी मिळणारं मोक्ष
ठरविले सर्वांनी एक
करायचाकपाळमोक्ष

दुरवलीमाणसे एकेक
नात्यांचे अंति दुर्भिक्ष
स्वता करी छायापेक्षा
वांझोटा वाळला वृक्ष

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक ... अचूक बातमी

# लक्ष्मीकांत कलमुर्गे यांच्यावरील खोटा गुन्हा रद्द करा

## पत्रकार संरक्षण समितीची मागणी...

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२२, कुंडलवाडी :** सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार लक्ष्मीकांत कलमुर्गे यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला गुन्हा खोटा असून त्याची निष्पक्ष चौकशी करून तो तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी मागणी पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक नांदेड, उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली तसेच पोलीस निरीक्षक बिलोली यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, लक्ष्मीकांत कलमुर्गे हे अनेक वर्षांपासून सामाजिक व पत्रकारितेच्या माध्यमातून जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहेत. उपजिल्हा शासकीय रुग्णालय बिलोली येथील आरोग्य सेवा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा, पोषण आहार वितरण तसेच विविध शासकीय योजनांतील त्रुटींबाबत त्यांनी वेळोवेळी प्रशासनाकडे तक्रारी व निवेदने सादर



केली आहेत.

याच जनहिताच्या कार्यामुळे काही संबंधित व्यक्तींनी संगनमताने त्यांच्याविरुद्ध खोटे व द्वेषभावनेतून प्रेरित आरोप करून गुन्हा दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदारांच्या आरोपांची सत्यता सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब तसेच उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे पडताळण्यात यावी. चौकशीत आरोप खोटे अथवा दिशाभूल करणारे असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित गुन्हा रद्द करून खोटी तक्रार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांना संरक्षण मिळणे ही लोकशाहीची गरज असल्याचे सांगत, या प्रकरणात न्याय्य व निष्पक्ष कारवाई करण्याची मागणी पत्रकार संरक्षण समितीने केली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक दिन साजरा




**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२३, वडाळा (मुंबई) :** भारतीय क्रीडा मंदिर(B.P.C.A) सभागृह, वडाळा, मुंबई. येथे आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक दिन साजरा करण्यात आला. सकाळी ८ वाजता ध्वजरोहनाने कार्यक्रमांची सुरुवात झाली. ह्या ऑलम्पिक दिनाचे औचित्य साधून बरीच नामवंत क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती सदर कार्यक्रमास लाभली. त्यात भारतीय क्रीडा मंदिर (B.P.C.A) चे महासचिव दिपक शेटे, हेड ऑफ डिपार्टमेंट फिजिकल एज्युकेशन मुंबई युनिव्हर्सिटीचे मनोहर माने, महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेचे कार्यकर्ते जय कोळी(बॉक्सिंग), पदमश्री पुरस्कार विजेते तथा कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उदय देशपांडे (मल्लखांब), दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते भास्कर करकेरा (तायक्वानडो), मुंबई जिल्हा क्रीडा अधिकारी अडसूळ मॅडम, छत्रपती पुरस्कार विजेते युवराज वाल्मिकी (हॉकी) यांची उपस्थिती होती.

ऑलम्पिक संघटनेशी संलग्न असलेल्या विविध खेळातील आंतरराष्ट्रीय पदक विजेते :-

१)अक्षरा शानबाग - युथ एशियन गेम (तायक्वानडो),

२)ध्रुव तंबाके -एशियन चॅम्पियनशिप (तायक्वानडो),

३)विदिश राऊत (योगा),

४)दित्या बालगी (योगा) यांचा सत्कार करण्यात आला. ह्या कार्यक्रमांस सहाय्यक म्हणून विरेंद्र गायकवाड, सुनिल साखरकर, प्रेमकुमार श्रेष्ठ यांची उपस्थिती होती.

## एन.एम.एम.टी. व्यवस्थापक नियुक्तीवर गदारोळ



**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.२३, खारघर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील रिक्त असलेल्या व्यवस्थापक पदाच्या नियुक्ती वरून सोमवारी महासभेत जोरदार गदारोळ झाला. परिवहन समितीच्या अधिकारात हस्तक्षेप करून आयुक्तांनी केलेले नियुक्तीवर सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनी अक्षेप घेतला. अखेर अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेटे यांनी नियुक्ती प्रक्रियेत चूक झाल्याचे मान्य केले. परिवहन व्यवस्थापक योगेश कडूसकर यांची नगर विकास विभागाने गोंदिया येथे बदली केल्या नंतर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी रिक्त पदाचा अतिरिक्त कारभार उपायुक्त भागवत डोईफोडे यांच्याकडे सोपवला होता. मात्र परिवहन समितीच्या सदस्यांनी या निर्णयाला विरोध करून हा अधिकार आयुक्तांना नव्हे तर परिवहन समितीकडे असल्याचा दावा केला. दरम्यान प्रशासनाकडून उपायुक्त भागवत डोईफोडे यांनी पद रिक्त असल्याने तत्पुरती नियुक्ती करणे आवश्यक होते असे स्पष्टीकरण दिले. मात्र चर्चेदरम्यान सभागृहातील सदस्यांनी परिवहन उपक्रमाच्या स्वायत्त अधिकाराचा मुद्दा उपस्थित केला. उपमहापौर दशरथ भगत यांनी

निर्णय चुकीचा असल्याचे नमूद केले. महापौर सुजाता पाटील यांनी प्रशासनाला परिवहन उपक्रमाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निदेश दिले असून परिवहन समिती सदस्य राहुल शिंदे यांनी महापालिका परिवहन आदी नियमानुसार रिक्त पदावर परिवहन क्षेत्राचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा अधिकार समितीला असल्याचे स्पष्ट केले. समितीने परिवहन उपक्रमात कार्यरत असलेले उमाकांत जंगले यांची नियुक्ती करण्याचा ठराव मंजूर करून महासभेकडे पाठवला.

## स्मार्ट मीटर बसविण्यास पाटण शहरातील ग्रामस्थांचा विरोध

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२३, पाटण :** पाटण शहरात स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या प्रस्तावावर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ग्रामस्थांनी एकमुखाने तीव्र विरोध दर्शविला. स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात वाढ होईल, सर्वसामान्य ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडेल आणि मीटरच्या कार्यपद्धतीबाबत अनेक शंका असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. सर्वांनी

> पाटणमध्ये स्मार्ट मीटरला नागरिकांचा वाढता विरोध आहे. त्यामुळे कुटुंबाची परवानगी घेतल्याशिवाय अधिकाऱ्यांनी स्मार्ट मीटर बसवू नका. जिथे जिथे स्मार्ट मीटर बसवले आहे ते तातडीने काढून घ्यावेत, अन्यथा स्मार्ट मीटर विरोधात आम्हाला आंदोलन छेडावे लागेल.
>
> **– नितीन पिसाळ, सामाजिक कार्यकर्ते**

स्मार्ट मीटरला कडाडून विरोध करत ज्या, ज्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसविले आहे ते तत्काळ काढून घ्यावेत, असा इशाराही बैठकीत ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना दिला आहे. पाटण येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात स्मार्ट मीटरबाबत नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस महावितरणचे अधिकारी कांबळे, कुंभार, पाटणच्या नगराध्यक्षा अनिता देवकांत व स्मार्ट मीटर बसविण्यासाठी ठेका घेतलेले अधिकारी उपस्थित होते. बैठकीत उपस्थित ग्रामस्थांनी, लोकप्रतिनिधींनी आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी स्मार्ट मीटरला विरोध करत स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात वाढ होण्याची भीती व्यक्त केली. मीटर रिचार्ज पद्धतीवर चालणार का, वीजपुरवठा तत्काळ खंडित होणार का, तांत्रिक बिघाड झाल्यास जबाबदारी कोणाची अशा अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे अधिकाऱ्यांकडून मिळालेली नसल्याचे नागरिकांनी सांगितले. आधीच वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. अशा परिस्थितीत स्मार्ट मीटरमुळे अतिरिक्त खर्च होण्याची भीती असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. अनेकांनी सध्याचे वीज मीटर व्यवस्थित सुरू असताना नवीन स्मार्ट मीटर बसविण्याची आवश्यकता काय असा प्रश्न उपस्थित केला तसेच ग्राहकांच्या हिताचे संरक्षण होईल, याची शासनाने स्पष्ट हमी द्यावी, अशी मागणी करत नागरिकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. याशिवाय महावितरणने स्मार्ट मीटरबाबत सांगण्यापेक्षा शासनाच्या सोलर योजनेची माहिती देवून त्याची नागरिकांमध्ये जनजागृती करावी, असे सांगितले.

स्मार्ट मीटरचा मुद्दा आता पाटण तालुक्यातील जनतेच्या चर्चेचा केंद्रबिंदू बनला असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यावर पुढे काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बैठकीस नगरपंचायतीचे नगराध्यक्षा, अनिता देवकांत, उपनगराध्यक्ष,जगदीश शेंडे, नगरसेवक, नागरिक, शेतकरी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# आडे येथे पावसाळी अंडरआर्म क्रिकेट स्पर्धेचा थरार

## 'ऑसीज फायटर्स' चा विजेतेपदावर कब्जा, 'फरहान स्पोर्ट्स' उपविजेता

**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.२३, दापोली (रत्नागिरी) :** शिवशक्ती स्पोर्ट्स आडे व शिवशक्ती झेंडेकर मंडळाच्या संयुक्त विद्यमाने भव्य आयोजन; कोकणातील नामांकित संघांमध्ये रंगली चुरशी ची लढत.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील आडे (कोळीवाडा) येथे शिवशक्ती झेंडेकर मंडळ आडे यांच्या सहकार्याने शिवशक्ती स्पोर्ट्स आडे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य पावसाळी अंडरआर्म सर्कल क्रिकेट स्पर्धा २०२६ उत्साहात आणि जल्लोषात पार पडल्या. कोकणातील विविध भागांतील नामांकित संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला विशेष रंगत प्राप्त झाली होती.

गेल्या अनेक वर्षांची परंपरा जपत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रत्येक सामन्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. अंतिम सामन्यात दमदार कामगिरी करत 'ऑसीज फायटर्स, राजापूर' संघाने विजेतेपद पटकावले. विजेत्या संघाला ₹५०,०५० रोख रक्कम व आकर्षक चषक प्रदान करण्यात आला.

तर 'फरहान स्पोर्ट्स, दापोली' संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद मिळविले. उपविजेत्या संघाला ₹२५,०२५ रोख पारितोषिक आणि चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक तसेच सामनावीर यांसारख्या वैयक्तिक पुरस्कारांचाही गौरव करण्यात आला. विविध



क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या स्पर्धेमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रसंगी उटंबर गावचे सुपुत्र मा.अशोक दादा पाटील (मुबंई भांडुप चे आमदार) दापोली तालुक्यातील, मा. साधनाताई बोत्रे, मंडळाचे अध्यक्ष रवींद्रजी कुलाबकर आणि इतर सर्व मान्यवर उपस्थित होते.

स्थानिक क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शिवशक्ती स्पोर्ट्स आडे व शिवशक्ती झेंडेकर मंडळाने केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, कोकणातील क्रिकेटप्रेमींसाठी ही स्पर्धा आकर्षणाचे केंद्र ठरली आहे.

# जिंतूरकरांच्या नशिबी घाणेरडे, दुर्गंधीयुक्त पाणी; आरोग्य धोक्यात, प्रशासन मात्र सुस्त

**अक्षराज रहीम कोक्कर**

**दि.२३, जिंतूर :** शहरात सध्या नागरिकांच्या तोंडचे पाणीच पळाले आहे. कारण शहरातील विविध प्रभागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून नळाद्वारे दुर्गंधीयुक्त, गढूळ आणि घाणेरड्या पाण्याचा पुरवठा होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. पिण्याच्या पाण्यासारख्या अत्यावश्यक आणि जीवनावश्यक सेवेत एवढी गंभीर बिघाड निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, नगरपालिका प्रशासन नेमके करतंय तरी काय? असा थेट सवाल आता सर्वसामान्य जिंतूरकर विचारू लागले आहेत.

शहरातील अनेक भागांत नळाला येणाऱ्या पाण्यातून तीव्र दुर्गंधी येत असल्याची, तसेच पाण्याचा रंग गढूळ, पिवळसर व अस्वच्छ दिसत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. हे पाणी पिण्यासाठी तर अयोग्य आहेच, पण स्वयंपाक, भांडी धुणे, अंघोळ, कपडे धुणे यांसारख्या दैनंदिन वापरासाठीही धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, ही समस्या केवळ एखाद्या एक-दोन भागापुरती मर्यादित नसून शहरातील अनेक भागांत एकाच वेळी अशीच परिस्थिती असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ तांत्रिक बिघाडाचा नसून संपूर्ण पाणीपुरवठा यंत्रणेतील निष्काळजीपणाचा आणि प्रशासनाच्या उदासीनतेचा असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे.

**उलट्या, जुलाब, पोटदुखीच्या तक्रारी; आरोग्याचा गंभीर प्रश्न**

दूषित पाण्यामुळे शहरात काही ठिकाणी उलट्या, जुलाब, पोटदुखी, ताप यांसारख्या तक्रारी वाढल्याची चर्चा असून, यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आजारी व्यक्तींसाठी ही परिस्थिती अधिक धोकादायक मानली जात आहे. पिण्याच्या पाण्यात जर दूषित घटक मिसळले असतील, तर गॅस्ट्रो, टायफॉईड, जंतुसंसर्ग, जलजन्य साथरोग पसरू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. आरोग्य विभाग आणि नगरपालिका प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेणे अपेक्षित असताना, अद्याप ठोस हालचाल दिसत नसल्याने नागरिकांचा रोष अधिकच वाढला आहे.

**पाणीपुरवठ्याच्या ठिकाणीच घाण? जनावरांचे व्हिडिओ व्हायरल...**

या प्रकरणाला अधिक गंभीर वळण देणारी बाब म्हणजे, ज्या ठिकाणाहून पाणीपुरवठा केला जातो त्या परिसरात डुकरे व इतर जनावरे वावरत असल्याचे, पाणी पित असल्याचे आणि घाण करत असल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहेत. या व्हिडिओंनी शहरात एकच खळबळ उडवली असून, पाणीपुरवठा व्यवस्थेच्या सुरक्षिततेबाबत आणि स्वच्छतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. जर पाणीपुरवठा केंद्र किंवा जलसाठ्यांच्या परिसरातच अशा प्रकारची अस्वच्छता असेल, तर शहरात



दूषित पाणी जाणे हे काही अनपेक्षित नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**प्रशासन झोपेत, लोकप्रतिनिधी मौनात?**

या संपूर्ण प्रकारात सर्वात जास्त संतापजनक बाब म्हणजे, एवढा गंभीर प्रश्न समोर असतानाही नगरपालिका प्रशासनाकडून वेगवान, पारदर्शक आणि जबाबदार प्रतिसाद दिसून येत नसल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, दूषित पाण्याचा प्रश्न हा एखाद्या रस्त्यावरील खड्ड्यासारखा साधा प्रश्न नसून तो थेट जीवित आणि आरोग्याशी संबंधित विषय आहे. अशा वेळी नगरपालिका प्रशासनाने तातडीने पाणीपुरवठा बंद करून तपासणी, दुरुस्ती, पर्यायी पाणीपुरवठा आणि नागरिकांना अधिकृत माहिती देणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात तशी हालचाल दिसत नसल्याने प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दुसरीकडे, शहरातील लोकप्रतिनिधीही या विषयावर आक्रमक भूमिका घेताना दिसत नाहीत, अशी टीका नागरिकांतून होत आहे. सत्ताधारी असोत वा विरोधक, पाणी हा नागरिकांच्या जगण्याचा प्रश्न असताना सर्वपक्षीय मौन का, असा सवालही उपस्थित होत आहे. सामान्य जनतेला घाणेरडे पाणी प्यावे लागत असताना राजकीय नेते, नगरसेवक, पदाधिकारी आणि जबाबदार लोकप्रतिनिधी नेमकी कोणती भूमिका घेत आहेत, हे स्पष्ट व्हायला हवे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

**सोशल मीडियावर संताप; 'शुद्ध पाणी द्या'ची मागणी तीव्र**

शहरातील अनेक नागरिकांनी समाजमाध्यमांवर घाणेरड्या पाण्याचे फोटो, व्हिडिओ आणि अनुभव शेअर करत नगरपालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला आहे. कर भरायचा आम्ही, पण पिण्यासाठी घाणेरडे पाणी घ्यायचे आम्हीच?, नळाला पाणी येते की आजार?, नगरपालिकेला नागरिकांच्या आरोग्याची काहीच काळजी नाही का? अशा संतप्त प्रतिक्रिया समाजमाध्यमांवर उमटत आहेत. काही ठिकाणी नागरिकांनी प्रशासनाविरोधात सामूहिक निवेदन देण्याची आणि आंदोलन छेडण्याचीही तयारी सुरू केल्याची चर्चा आहे.

**पाईपलाईन गळती, ड्रेनेज मिसळणे की जलशुद्धीकरणात हलगर्जी?**

शहरात दूषित पाणीपुरवठ्याचे नेमके कारण काय, हा आता सर्वात महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. पाईपलाईन जुनी व गळकी असल्याने ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत आहे का?, जलशुद्धीकरण प्रक्रियेत काही त्रुटी आहेत का?, पाणीपुरवठा केंद्राच्या परिसरात अस्वच्छता आहे का?, टाक्यांची नियमित स्वच्छता व निर्जंतुकीकरण केले जाते का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने नागरिकांसमोर स्पष्ट करणे आवश्यक आहे. केवळ तपासणी सुरू आहे किंवा लवकरच सुधारणा होईल अशा नेहमीच्या उत्तरांनी आता नागरिकांचे समाधान होणार नाही.

**तातडीच्या मागण्या : तपासणी, अहवाल आणि पर्यायी स्वच्छ पाणी**

जिंतूर शहरातील नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांकडून आता काही ठोस मागण्या पुढे येत आहेत त्यामध्ये...

- शहरातील सर्व भागांतील दूषित पाणीपुरवठ्याची तात्काळ तपासणी करण्यात यावी.
- संबंधित भागांतील पाईपलाईन, गळती, ड्रेनेज मिसळण्याची शक्यता यांची प्रत्यक्ष पाहणी करून दोष दूर करावेत.
- पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवून त्याचा अधिकृत अहवाल जाहीर करावा.
- पाणीपुरवठा केंद्र, टाक्या व जलस्रोत परिसराची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करावे.
- जोपर्यंत प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत नागरिकांसाठी टँकरद्वारे स्वच्छ पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करावी.
- या प्रकरणात हलगर्जीपणा आढळल्यास जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी.
- भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना आणि देखरेख यंत्रणा उभी करावी.

**नागरिकांचा इशारा : 'आता उत्तर नको, कृती हवी'**

जिंतूर शहरातील दूषित पाणीपुरवठ्याचा प्रश्न आता फक्त तक्रारींच्या पातळीवर राहिलेला नाही; तो नागरिकांच्या सहनशक्तीचा अंत पाहणारा आणि प्रशासनाच्या संवेदनशीलतेची परीक्षा घेणारा विषय ठरत आहे. शहरातील जनतेचा संताप दिवसेंदिवस वाढत असून, प्रशासनाने तातडीने ठोस कारवाई केली नाही तर हा प्रश्न अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जिंतूरकरांना आता आश्वासनांची नाही, तर स्वच्छ पाणी, अधिकृत तपासणी अहवाल आणि जबाबदारांवर कारवाई यांची गरज आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून शहराला तातडीने दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे.

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातर्फे उद्या धरणे व निदर्शने आंदोलन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने पावसाळी अधिवेशनादरम्यान संघटनेचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले व माजी आमदार व्हि. यू. डायगव्हाणे यांच्या नेतृत्वात गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक नागपूर कार्यालयासमोर व विदर्भातील सर्व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे. राज्यातील खाजगी, स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, खाजगी अनुदानित शाळा, विजाभज तसेच आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनात राज्यातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १०० टक्के अनुदान मिळालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना देणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीवरील बंदी उठविणे, शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरणे, शाळांना सातव्या वेतन आयोगावर आधारित १०० टक्के वेतनेत्तर अनुदान देणे, तसेच शिक्षकांना १०-२०-३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करणे अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. याशिवाय नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षक व कर्मचाऱ्यांना १५ टक्के नक्षल ग्रस्त भत्ता देणे, अंशतः अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा व इतर सेवा लाभ देणे, विद्यार्थ्यांच्या हितासाठी २० पटाखालील शाळा बंद न करण्याची मागणी, तसेच शिक्षकांचे निवृत्ती वय ६० वर्षे करणे, संगीत शिक्षकांच्या मागण्या मंजूर करणे तसेच शिक्षण क्षेत्राशी संबंधित एकूण ४० मागण्यांना घेऊन आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात विदर्भातील सर्व जिल्ह्यांतील संघटनेचे प्रांतीय पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, जिल्हा कार्यवाह तसेच शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन विमाशी संघटनेचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, जयकुमार सोनखासकर, विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, बाळासाहेब गोटे, कोषाध्यक्ष भूषण तल्हार तसेच जिल्हा, महानगर, तालुका पदाधिकारी यांनी केले आहे.

अक्षराज



# शेतकऱ्यांसाठी मंत्रालयात घुसून आंदोलन करू : खा. निलेश लंके यांचा इशारा

## सरसकट कर्जमाफीसाठी पारनेरमध्ये सर्वपक्षीय मोर्चा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने तातडीने लक्ष दिले नाही तर राज्यभर जनआक्रोश वणवा पेटवल्याशिवाय राहाणार नाही. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळावा, तसेच बियाणे, खते, औषधे आणि इंधनाच्या वाढलेल्या किमती कमी कराव्यात दोन दिवसांत अतिवृष्टीची म दत वितरीत करा, अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी मंत्रालयात घुसून आंदोलन करण्यास आम्ही मागे पुढे पाहणार नाही असे स्पष्ट मत खासदार निलेश लंके यांनी पारनेर तहसील येथे सर्वपक्षीय आंदोलनात बोलताना व्यक्त केले.

शेतकऱ्यांच्या विविध प्रमुख मागण्यांसाठी पारनेर येथे मंगळवारी (ता.२३) खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली आक्रोश मोर्चा काढण्यात आला.




**बैलगाड्या आणि कांद्याच्या माळा !**

पारनेर येथील तहसील कार्यालयावर कर्जमाफीसह अन्य मागण्यासाठी काढण्यात आलेल्या मोर्चात ट्रॅक्टर, बैलगाडीसह शेळ्या- मेंढ्या कोंबड्या घेऊन तालुक्यातील शेतकरी सहभागी झाले होते. खासदार निलेश लंके यांच्यासह सहभागी पदाधिकाऱ्यांनी गळ्यात घातलेल्या कांद्याच्या माळा मोर्चात आकर्षण ठरल्या.

या मोर्चात विविध पक्षांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कर्जमाफी योजनांमध्ये अनेक अटी-शर्ती लावण्यात आल्याने मोठा वर्ग लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. त्यामुळे कोणत्याही अटींशिवाय सरसकट कर्जमाफी लागू करावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

तसेच पीकविमा योजनेतील जाचक अटी आणि ट्रिगर पद्धत रद्द करून पूर्वीप्रमाणे एक रुपयात पीकविमा योजना पुन्हा सुरू करावी, अशीही मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. शेतकरी हिताच्या विविध मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही या वेळी देण्यात आला.

मोर्चादरम्यान कांद्यासह अन्य शेतीमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. शेतीमालाच्या उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना बाजारात अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी संकटात सापडल्याचे आंदोलकांनी सांगितले. त्यामुळे शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देण्याची मागणी करण्यात आली.

मोर्चात राष्ट्रवादी, काँग्रेस, मनसेसह विविध पक्षांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. शासनाने या मागण्यांची दखल घेतली नाही, तर मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा खासदार लंके यांनी दिला.

# भीमा नदीकाठच्या भागातील वीज समस्येवर तातडीने उपाययोजना करा

अक्षराज : विकास सरवळे

पंढरपूर : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ व प्रामुख्याने भीमा नदीकाठच्या भागात घरगुती, शेती पंप आणि उद्योगांसाठी होत असलेल्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या महाराष्ट्र विधान मंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु असून यामध्ये आमदार सुभाष देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नावर तालिका अध्यक्ष आमदार समाधान आवताडे यांनी माझ्याही मतदारसंघात व भीमा नदीकाठच्या भागात विजेची समस्या भेडसावत असल्याने ऊर्जा विभागाला तसे आदेश दिले असल्याचे सांगितले आहे. यामुळे लवकरच ग्रामीण भागातील विजेची समस्या दूर होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा म तदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार आवताडे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यातील वीजपुरवठ्याच्या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले आहे. महावितरणच्या नियमानुसार शेती पंपांसाठी सलग आठ तास वीज, भगीरथ योजनेअंतर्गत घरगुती वापरासाठी नियमित सिंगल फेज वीज आणि उद्योगांसाठी अखंडित वीजपुरवठा अपेक्षित असताना प्रत्यक्षात अनेक भागांत शेतकऱ्यांना चार तासही पुरेशी वीज मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. सौरऊर्जेमुळे दिवसा आठ तास वीज दिली जात असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक भागात कमी दाबाने आणि खंडित स्वरूपात



वीजपुरवठा होत असल्याने शेतीची कामे प्रभावित होत आहेत. तसेच ग्रामीण भागात घरगुती वापरासाठी सकाळी आणि सायंकाळी आवश्यक असलेली सिंगल फेज वीजही नियमित मिळत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे नागरिक त्रस्त असताना रात्रीच्या वेळेस वीजपुरवठा खंडित होत असल्याने गैरसोयी वाढल्या असून चोरीच्या घटनांमध्येही वाढ झाल्याची बाब आवताडे यांनी पत्रात नमूद केली आहे. या पार्श्वभूमीवर अनेक गावांमध्ये नागरिकांकडून म ोर्चे आणि आंदोलने करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांसोबत दोन ते तीन वेळा बैठका घेऊनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचे आवताडे यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने सलग आठ तास वीज, उद्योगांसाठी अखंडित वीजपुरवठा तसेच नागरिकांना सुरळीत सिंगल फेज वीज उपलब्ध करून देण्यासाठी तात्काळ आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

आमदार आवताडे यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने वीज सम स्येवर लवकरच दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आ.दातेंच्या आक्रमक भूमिकेनंतर सरकारची भूमिका स्पष्ट; चारा विकासासाठी विशेष निधी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती व पशुधनासमोरील चारा टंचाईच्या प्रश्नावर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नाला उत्तर देताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता लक्षात घेऊन पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन शासनाने हाती घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मंत्री मुंडे यांनी सांगितले की, राज्यातील संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी वार्षिक योजनेअंतर्गत किमान १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधीची तरतूदही करण्यात येणार आहे.

आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामध्ये राज्यातील चारा विकास कार्यक्रमासाठी उपलब्ध निधी, मुख्यमंत्री ग्राम ीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदी तसेच चारा बियाण्यांच्या वितरणाबाबत माहिती मागितली होती. त्यास उत्तर देताना मंत्री मुंडे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राबविण्यात येत असून, त्यामध्ये चारा विकास



कार्यक्रमाचाही समावेश करण्यात आला आहे.

याशिवाय राज्यातील पशुपालकांना चारा पिकांच्या बियाण्यांचे वितरण, चारा पिकांचे प्रात्यक्षिके तसेच चारा नियोजनाचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि ग्रामीण भागातील विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत असल्याचेही मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, आमदार काशिनाथ दाते यांनी दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पशुपालकांना वेळेत मदत मिळावी, चारा टंचाई निर्माण होऊ नये आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पशुधनाचे संरक्षण व्हावे, यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी सभागृहात केली होती. या प्रश्नामुळे राज्यातील पशुपालकांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आल्या असून, चारा विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट झाल्याने पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# पहिल्याच पावसात भानेगाव ग्रामपंचायतीचे पितळ उघडे...

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** गाव तसं चांगलं, पण वेशीला टांगलं अशीच काहीशी गत सध्या भानेगाव ग्रामपंचायतीची झाली आहे. पावसाळा तोंडावर असताना ग्राम पंचायत प्रशासनाने कोणतीही पूर्वतयारी केली नसल्याने पहिल्याच मुसळधार पावसाने ग्रामपंचायत प्रशासनाचा ढिसाळ कारभार चव्हाट्यावर आणला आहे. भानेगाव-पारशिवनी मार्गावरील पाणी वाहून नेणारी पायली व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची ड्रेन जाम झाली त्यामुळे वॉर्ड क्रमांक ४ परिसरात गुडघाभर पाणी शिरल्यामुळे येथील नागरिक कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.

भानेगाव वॉर्ड क्रमांक ३ व ४ म धील पावसाच्या पाण्याचा विल्हेवाट लावण्यासाठी वार्ड क्रमांक ४ तात्पुरती नाली तयार करण्यात आली आहे. शिवाय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पाणी वाहून नेण्यासाठी भानेगाव पारशिवनी मार्गावर पायल्या टाकल्या आहेत.

पावसाळ्यापूर्वी या पायल्यांची साफसफाई करणे गरजेचे होते. मात्र, ग्रामपंचायत आणि महामार्ग प्राधिकरणाने याकडे दुर्लक्ष केले. परिणामी या पायल्यांम ध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा व गाळ जमा झाला आहे. २३ जून मंगळवारला सायंकाळी झालेल्या पहिल्याच पावसात पाणी पुढे जाण्याऐवजी वॉर्ड क्रमांक ४



मधील परिसरात शिरले आहे.

वॉर्ड क्रमांक ४ मधील पाण्याची ही समस्या नवीन नाही, मागील अनेक वर्षांपासून तळ ठोकून आहे या संदर्भात स्थानिक नागरिकांनी राष्ट्रीय म हामार्ग प्राधिकरण आणि भानेगाव ग्राम पंचायतीकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी केल्या, मात्र दुर्लक्ष करण्यात आले. प्रशासनाच्या याच हलगर्जीपणामुळे आज नागरिकांना घरात पाणी जाण्याची वेळ आली आहे

यासंदर्भात भानेगावच्या सरपंच शालिनी चवरे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी जाम झालेल्या पायल्यांची आणि नाल्यांची त्वरित साफसफाई करण्यात येईल. नागरिकांना त्रास होणार नाही यासाठी योग्य त्या उपाययोजना युद्धपातळीवर राबवल्या जातील असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

## थोडक्यात

# खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मनोरंजन केंद्र-१ मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी आणि वसाहतीमधील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्य अभियंता विवेक रोकडे, उपमुख्य अभियंतागण नितीन रोकडे, सचिन देगवेकर, किशोर सूर्यवंशी अधीक्षक अभियंता आनंद सातबद्रे, कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन करून करण्यात आली.

मुख्य अभियंता विवेक रोकडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना निरोगी आरोग्यासाठी योगाचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. केवळ एक दिवस नव्हे, तर प्रत्येकाने दररोज आपल्या दिनचर्येत योगाचा समावेश केला पाहिजे.

कार्यक्रमात आमंत्रित योगशिक्षक रंगराव ठाकरे यांनी उपस्थित साधकांना विविध योगासने, प्राणायाम आणि त्यांचे मानवी शरीराला होणारे फायदे याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी स्वतः काही कठीण आसनांची प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यांच्या मार्गदर्शनात उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि महिला साधकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने प्राणायाम व योगासने केली.

योगोत्सवाला खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती होती. तसेच प्रकाश नगर वसाहतीमधील महिलांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन योगसाधना केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन स्वीटी वाहने यांनी केले.

# ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन साजरा



**अक्षराज : अब्दुल.मुबिन**

**दि.२३, देगलूर (नांदेड) :** रविवार, दिनांक २१ जून २०२६ रोज या दिवशी जागतिक योगा दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी शाळेतील सर्व मुलांना सर्वप्रथम काही महत्व पूर्ण असे, योगासनाचे आठ ते दहा प्रकार घेण्यात आले.सर्व मुलांनी व सर्व शिक्षकवर्गानी सुद्धा सहभाग नोंदवला होता.

मुलांनी अत्यंत स्फूर्तपणे सहभागी झाले विद्यार्थाचे योगासनाचे प्रकार करून झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगताद्वारे योगासनाचे महत्व सांगितले. तसेच शिक्षकांनी काही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात किरण बोईवार यांनी योगा चा इतिहास सांगितले व योगासने दैनंदिन जीवनात दररोज करीत रहा, असे मार्गदर्शन केले. किशवे सर यांनी आरोग्य चांगले ठेवण्यासाठी योगासने करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षिय समारोप मध्ये ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूलचे प्राचार्य संजीब लिमा यानी मुलांना आरोग्य सुदृढ राखावे चांगले अन्न भोजन करावे व तसेच दररोज योगा करणे हिताचे आहे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे फलक लेखन अतिशय सुंदर अश्या रंगरंगोटी द्वारे मयुरी मॅडम यांनी फलक लेखनाचे कार्य केलेत. या कार्यक्रमाचे यशस्वी असे सूत्रसंचालन दहावी वर्गाचे विदयार्थीनी सई वद्देवार व श्रेया अल्लमवार यांनी केले. तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख मुबिन सर यांनी केले या कार्यक्रमाच्या स्थळी सर्व शिक्षकवृंद उपस्थित स्थित होते.

# ग्रामीण रुग्णालय पालम येथे योग दिन साजरा




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२३, पालम (परभणी) :** दि.२१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय, पालम येथे शनिवारी सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासने, ध्यानसाधना व प्राणायामाचा सराव उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात प्रभातचल संघ (मॉर्निंग वॉक ग्रुप) चे सर्व सक्रिय सदस्य, ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी एकाग्रचित्ताने योगाभ्यास करून योगाचे महत्त्व अनुभवले.योग शिक्षक डॉ. किरण बिडवई यांनी उपस्थितांना योगासने, ध्यानसाधना व प्राणायामाचे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रमोद रोकडे यांनी केले होते.

यावेळी प्रा. अनंतराव शिंदे व डॉ. बालाजी ईप्पर यांनी आपल्या मनोगतातून योगासनांचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व विशद केले. नियमित योगाभ्यासामुळे निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. प्रमोद रोकडे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, प्रशिक्षक व सहभागींचे आभार मानले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे आरोग्याविषयी जनजागृती होण्यास मदत झाली.